# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १३१/२०१८

'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५' आल्यापासून सदर अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी व कायदेशीर बाबींचे तंतोतंत पालन व्हावे याकरिता विद्यापीठाने कार्यान्वित केलेल्या प्रशासकीय यंत्रणेची सर्व संबंधिताना माहिती होण्याच्या उद्देशाने सदर परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५' अंतर्गत प्राप्त होणाऱ्या विविध अर्जांबाबत 'माहिती अधिकार अधिनियम, २००५' नुसार पुढील सर्व कार्यवाही ही केंद्रीय पध्दतीने माहिती अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात येते. बहुतांश वेळी अर्जदार यांनी मागितलेली माहिती ही विद्यापीठाच्या एकापेक्षा अधिक विभागांशी संबंधित असते, त्यामुळे विसंगत अथवा अपूर्ण माहिती अर्जदारास उपलब्ध होऊ नये तसेच अर्जदारास विद्यापीठाच्या विविध विभागांकडे संपर्क साधावयास लागू नये व माहिती सहजपणे उपलब्ध व्हावी म्हणून विद्यापीठस्तरावर स्वतंत्रपणे 'माहिती अधिकारी कार्यालय' स्थापन करुन केंद्रीय पध्दतीने 'माहिती अधिकार अधिनियम, २००५' ची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जाते. माहिती अधिकारी कार्यालयाकरिता विद्यापीठाने जनमाहिती अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली असून जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांची माहिती खालीलप्रमाणे :

| जनमाहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|
| १. श्रीमती मेघना रा. सावंतभोसले, माहिती अधिकारी<br>२. श्रीमती अरुणा वि. चव्हाण, माहिती अधिकारी<br>कार्यालयाचा पत्ता :- माहिती अधिकारी कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७<br>दूरध्वनी क्र. ०२०-२५६०११९९/११७६<br>ईमेल.- rti@unipune.ac.in | डॉ.अरविंद शाळिग्राम,<br>प्रभारी कुलसचिव,<br>प्रशासकीय भवन, कुलसचिव कार्यालय,<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७<br>दूरध्वनी क्र. ०२०-२५६०११८१/११८२<br>ईमेल.- regis@unipune.ac.in |

सर्व प्रशासकीय शाखाप्रमुख व शैक्षणिक विभागप्रमुख यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसारच माहिती अधिकारी यांचेकडून संबंधित अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिली जाते. त्यामुळे विद्यापीठामध्ये स्वतंत्रपणे माहिती अधिकारी यांची नियुक्ती केलेली असली तरी देखील माहिती अधिकारी अशा माहितीसाठी ज्या अधिकाऱ्यांवर अवलंबून असतात, त्या अधिकाऱ्यांनादेखील 'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५' कलम ५(५) मधील तरतुदीनुसार जनमाहिती अधिकारी असल्याचे **(Treated as PIO)** समजले जाते. त्यामुळे प्रत्येक प्रशासकीय विभागाचे शाखाप्रमुख व शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख हे त्यांच्या विभागाशी संबंधित प्रकरणांसाठी जनमाहिती अधिकारी असल्याचे समजले जातात व त्यांच्याकडून माहिती उपलब्ध करुनच संबंधित अर्जदारास उपलब्ध करुन दिली जाते. यापुढेही अर्जदारांकडून अर्ज स्वीकारणे व त्यांना माहिती पुरविणे हे केंद्रीय पध्दतीने माहिती अधिकारी कार्यालयामार्फत सुरु राहील. सबब, सर्व प्रशासकीय शाखाप्रमुख व शैक्षणिक विभागप्रमुख हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ५(५) मधील तरतुदींनुसार त्यांच्या विभागाशी संबंधित प्रकरणांसाठी जनमाहिती अधिकारी असल्याचे समजले जात असल्यामुळे सर्व संबंधितांनी या बाबींची दखल घेऊन यापुढे देखील माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता विद्यापीठाच्या माहिती अधिकारी कार्यालयास सहकार्य करावे.

या परिपत्रकासोबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ५(५) मधील तरतुदींनुसार ज्यांना जनमाहिती अधिकारी असल्याचे समजले जाते (Treated as PIO) अशा विभागनिहाय अधिका-यांची यादी जोडलेली आहे.

30/7/18

**(डॉ.अरविंद शाळिग्राम)**
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/ 3286
दिनांक : 30 JUL 2018

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.

C:\Documents and Settings\Administrator\My Documents\Non-Teaching\2018\Circular 2018\RTI.docx

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ५(५) मधील तरतुदींनुसार ज्यांना जनमाहिती अधिकारी असल्याचे (Treated as PIO) समजले जाते असे विभागनिहाय अधिकारी/विभागप्रमुख/संचालक**

| अ.क्र. | प्रशासकीय / शैक्षणिक विभाग | अधिकारी/विभागप्रमुख/संचालक |
|---|---|---|
| १. | मा.कुलगुरु कार्यालय | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| २. | मा.प्र-कुलगुरु कार्यालय | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| ३. | मा.कुलसचिव कार्यालय | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| ४. | प्रशासन शिक्षकेतर कक्ष | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| ५. | प्रशासन शिक्षक कक्ष | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| ६. | जनसंपर्क कार्यालय | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| ७. | समन्वय कक्ष (माध्यम) | विशेष कार्याधिकारी |
| ८. | कायदा कक्ष | वरिष्ठ कायदा अधिकारी / उपकुलसचिव (कायदा व तक्रार निवारण) |
| ९. | तक्रार निवारण कक्ष | उपकुलसचिव (कायदा व तक्रार निवारण) / सहायक कुलसचिव |
| १०. | माहिती अधिकारी कार्यालय | माहिती अधिकारी |
| ११. | आरक्षण कक्ष | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| १२. | सर्वसाधारण | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| १३. | सभा व दप्तर | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| १४. | निवडणूक | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| १५. | मुद्रणालय | व्यवस्थापक |
| १६. | सुरक्षा कक्ष | संचालक, सुरक्षा / सुरक्षा अधिकारी |
| १७. | स्थावर | कार्यकारी अभियंता / उपअभियंता |
| १८. | गृहव्यवस्थापन | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| १९. | आरोग्य केंद्र | आरोग्य अधिकारी |
| २०. | सेंटर फॉर नेटवर्क कॉम्प्युटिंग | विभागप्रमुख |
| २१. | आंतरराष्ट्रीय केंद्र | संचालक |
| २२. | सेट परीक्षा | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| २३. | शैक्षणिक-संलग्नता, शिक्षक मान्यता आणि अभ्यासमंडळे व विद्याशाखा | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| २४. | शैक्षणिक प्रवेश | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| २५. | शैक्षणिक पात्रता / बहि:स्थ | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| २६. | अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| २७. | नियोजन व विकास | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| २८. | विद्यार्थी सुविधा केंद्र | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| २९. | परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे कार्यालय | संचालक |
| ३०. | छाननी व तालिनीकरण | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| ३१. | पदवी प्रमाणपत्र, गोपनीय, बारकोड कक्ष | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| ३२. | छायांकित प्रत, पुनर्मूल्यांकन व गोदाम कक्ष | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| ३३. | परीक्षा समन्वय कक्ष | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| ३४. | ऑनलाईन व अभियांत्रिकी | विशेष कार्याधिकारी / समन्वयक |

AS

| अ.क्र. | प्रशासकीय / शैक्षणिक विभाग | अधिकारी/विभागप्रमुख/संचालक |
|---|---|---|
| ३५. | वित्त व लेखा | उप वित्त व लेखा अधिकारी / सहायक वित्त अधिकारी |
| ३६. | इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी सेल | आय.टी.व्यवस्थापक |
| ३७. | मध्यवर्ती कार्यशाळा | कर्मशाळा कार्यदेशक |
| ३८. | न्यायाधिकरण | उपकुलसचिव / सहायक कुलसचिव |
| ३९. | विद्यावाणी कम्युनिटी रेडिओ १०७.४ एफ.एम. | मानद संचालक |
| ४०. | विद्यापीठ उपकेंद्र-अहमदनगर जिल्हा | संचालक |
| ४१. | विद्यापीठ उपकेंद्र-नाशिक जिल्हा | समन्वयक |
| ४२. | वसतिगृहे | मुख्य वसतिगृहप्रमुख |
| ४३. | विद्यापीठ कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र | सहायक संचालक |
| ४४. | माहिती तंत्रज्ञान सेवा | संचालक |
| ४५. | नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ | संचालक |
| ४६. | इलेक्ट्रॉनिक-सायन्स | विभागप्रमुख |
| ४७. | उपकरणशास्त्र | विभागप्रमुख |
| ४८. | गणित | विभागप्रमुख |
| ४९. | पर्यावरणशास्त्र | विभागप्रमुख |
| ५०. | प्राणिशास्त्र | विभागप्रमुख |
| ५१. | जैवतंत्रज्ञान | विभागप्रमुख |
| ५२. | भूगोल | विभागप्रमुख |
| ५३. | भूशास्त्र | विभागप्रमुख |
| ५४. | भौतिकशास्त्र | विभागप्रमुख |
| ५५. | रसायनशास्त्र | विभागप्रमुख |
| ५६. | वनस्पतिशास्त्र | विभागप्रमुख |
| ५७. | वातावरण व अवकाशशास्त्र | विभागप्रमुख |
| ५८. | संख्याशास्त्र | विभागप्रमुख |
| ५९. | संगणकशास्त्र | विभागप्रमुख |
| ६०. | माध्यम व संज्ञापन अभ्यास विभाग | विभागप्रमुख |
| ६१. | सूक्ष्मजीवशास्त्र | विभागप्रमुख |
| ६२. | आरोग्यशास्त्र | संचालक |
| ६३. | आंतरशास्त्र ऊर्जा अभ्यासप्रणाली | संचालक |
| ६४. | इंटरडिसिप्लिनरी स्कूल ऑफ सायंटिफिक कॉम्प्युटिंग | संचालक |
| ६५. | इन्स्टिट्यूट ऑफ बायोइन्फर्मेटिक्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी | संचालक |
| ६६. | बायोइन्फर्मेटिक्स सेंटर | संचालक |
| ६७. | सेंटर फॉर इन्फर्मेशन ॲण्ड नेटवर्क सिक्युरिटी | संचालक |
| ६८. | सेंटर फॉर मॉडेलिंग ॲण्ड सिम्युलेशन | संचालक |
| ६९. | स्कूल ऑफ बेसिक मेडिकल सायन्स | संचालक |
| ७०. | तंत्रज्ञान | विभागप्रमुख |
| ७१. | वाणिज्य विभाग व संशोधन केंद्र | विभागप्रमुख |
| ७२. | व्यवस्थापनशास्त्र | विभागप्रमुख |
| ७३. | मराठी | विभागप्रमुख |
| ७४. | हिंदी | विभागप्रमुख |
| ७५. | इंग्रजी | विभागप्रमुख |

AS

| अ.क्र. | प्रशासकीय / शैक्षणिक विभाग | अधिकारी/विभागप्रमुख/संचालक |
|---|---|---|
| ७६. | संस्कृत-प्राकृत भाषा | विभागप्रमुख |
| ७७. | पाली | विभागप्रमुख |
| ७८. | परकीय भाषा | विभागप्रमुख |
| ७९. | संस्कृत प्रगत अध्ययन केंद्र | संचालक |
| ८०. | अर्थशास्त्र | विभागप्रमुख |
| ८१. | इतिहास | विभागप्रमुख |
| ८२. | तत्त्वज्ञान | विभागप्रमुख |
| ८३. | मानवशास्त्र | विभागप्रमुख |
| ८४. | मानसशास्त्र | विभागप्रमुख |
| ८५. | राज्यशास्त्र व लोकप्रशासन | विभागप्रमुख |
| ८६. | समाजशास्त्र | विभागप्रमुख |
| ८७. | संरक्षण व सामरिकशास्त्र | विभागप्रमुख |
| ८८. | आंतरप्रणाली अभ्यासकेंद्र (मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे) | संचालक |
| ८९. | क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र | संचालक |
| ९०. | आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ | संचालक व विभागप्रमुख |
| ९१. | बुध्दिस्ट स्टडीज सेंटर | विभागप्रमुख |
| ९२. | बुध्दिस्ट स्टडीज सेंटर ॲण्ड डॉ.बाबासाहेब आंबेडकर थॉट्स | विभागप्रमुख |
| ९३. | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्टडीज सेंटर | संचालक |
| ९४. | विधी | विभागप्रमुख |
| ९५. | यशवंतराव चव्हाण नॅशनल सेंटर ऑफ इंटरनॅशनल सिक्युरिटी ॲण्ड डिफेन्स अॅनॅलिसिस (वायसी-निसदा) | संचालक |
| ९६. | सेंटर फॉर सोशल सायन्सेस ॲण्ड ह्यूमॅनिटीज | समन्वयक |
| ९७. | शिक्षणशास्त्र व विस्तार | विभागप्रमुख |
| ९८. | शारीरिक शिक्षणशास्त्र | विभागप्रमुख |
| ९९. | ललितकला केंद्र, गुरुकुल | विभागप्रमुख |
| १००. | जयकर ज्ञानस्त्रोत केंद्र | संचालक |
| १०१. | ग्रंथालय आणि माहितीशास्त्र | विभागप्रमुख |
| १०२. | संज्ञापन व वृत्तपत्रविद्या (रानडे इन्स्टिट्यूट) | विभागप्रमुख |
| १०३. | कौशल्य विकास केंद्र | संचालक |
| १०४. | आय.एस.आर.ओ.(इस्त्रो)-यूओपी स्पेस टेक्नॉलॉजी सेल | मानद संचालक |
| १०५. | बहिःशाल शिक्षण मंडळ | मानद संचालक |
| १०६. | राष्ट्रीय सेवा योजना | कार्यक्रम समन्वयक |
| १०७. | विद्यार्थी विकास मंडळ | संचालक |
| १०८. | विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ | संचालक / सहायक क्रीडा संचालक |
| १०९. | मानव संसाधन विकास केंद्र (एच.आर.डी.सी.) | संचालक |
| ११०. | स्पर्धा परीक्षा केंद्र | संचालक |

उपरोक्त नमूद अधिकारी/विभागप्रमुख/संचालक हे त्यांच्या विभागाशी संबंधित प्रकरणांसाठी जनमाहिती अधिकारी असल्याचे समजले जाईल. त्यांच्याकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन विद्यापीठाच्या माहिती अधिकारी कार्यालयातील जनमाहिती अधिकाऱ्यांकडून संबंधित अर्जदारास पुरवण्यात येईल.

AS
३०।७।१८
(डॉ.अरविंद शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव

C:\Documents and Settings\Administrator\My Documents\Non-Teaching\2018\Circular 2018\RTI.docx